वाचले:- महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक NGT – २०१८/प्र. क्र. २/तां. क. ३, दि. १३/१२/२०१८.

जा.क्र./मप्रनि/प्राकाऔ/9053
प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, औरंगाबाद
यांचे कार्यालय, औरंगाबाद.
दि. 30/07/2019

आदेश:-

देशातील नद्यांच्या प्रदूषित पट्टयांबाबत दि. १७/०९/२०१८ रोजी दैनिक " द हिंदू " मध्ये प्रसिद्ध वृत्ताच्या अनुषंगाने मा. राष्ट्रीय हरित लवाद, नवी दिल्ली यांच्या मुळ अर्ज क्र. ६७३/२०१८ दाखल करून घेण्यात आला होता. मा. लवादाने सदर प्रकरणी दिनांक. २०/०९/२०१८ रोजी आदेश पारित करतांना संपूर्ण देशामध्ये ३५१ प्रदूषित पट्टे असून सदर प्रदूषित पट्टयांचे वर्गीकरण प्राधम्य क्र. I ते IV प्रकारामध्ये केले आहे त्यामध्ये राज्यातील एकूण ५३ प्रदूषित पट्टयांचा समावेश करण्यात आला असून सदर ५३ प्रदूषित पट्टयांमधील ९ प्रदूषित पट्टे प्राथम्य क्र. १,६ प्रदूषित पट्टे प्राथम्य क्र. ११,१४ प्रदूषित पट्टे प्राथम्य III, १० प्रदूषित पट्टे प्राथम्य क्र.IV व १४ प्रदूषित पट्टे प्राथम्य क्र. V मध्ये समाविष्ट आहेत. १४ प्रदुषित पट्टे प्राथम्य क्र. V मध्ये लातूर जिल्हयातील मांजरा नदीच्या प्रदुषित पट्टा हा लातूर - अंबाजोगाई रोडवरील मौ. महापूर येथील पुलापासून ते लातूर – नांदेड रोडवरील मौ. भातखेडा येथील पुलापर्यंतचा समावेश झालेला आहे.

मा. हरीत लवाद. नवी दिल्ली यांनी दिलेल्या निर्देशानुसार राज्यातील ५३ प्रदूषित नद्यांच्या पट्टयांमधील प्रदूषण कमी करण्याकरीता कृती आराखडा तयार करणे, त्याची अंमलबजावणी करण्याकरीता नदी पुनरुत्थान समिती, पर्यावरण संनियंत्रण कार्यदल नियुक्त करण्याचे आदेश उपरोक्त शासन निर्णयानुसार देण्यात आलेले आहेत. त्या अनुषंगाने मा. न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार प्रदूषित नदीपट्टयांमधील प्रदूषण रोखण्याकरीता लातूर जिल्हयासाठी स्वतंत्र पर्यावरण संनियंत्रण दल (**Special Environment Surveillance Task Force**) ची स्थापना मा. जिल्हाधिकारी, लातूर यांच्या मान्यतेने खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कृती दलाचे सदस्य |
|---|---|
| १. | जिल्हा वरिष्ठ भू वैज्ञानिक अधिकारी, लातूर. |
| २. | उप- पोलिस अधिक्षक (मुख्यालय), लातूर. |
| ३. | सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण. लातूर. |
| ४. | उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, लातूर. |

उपरोक्त समितीच्या सदस्यांमध्ये समन्वय साधणे, वेळ प्रसंगी क्षेत्र भेटीचे नियोजन करणे, बैठकांचे आयोजन करणे व निर्णयांची अंमलबजावणी करणे इत्यादी बाबत कार्यवाही करण्याची जबाबदारी उप – प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, लातूर यांची राहील.

प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, औरंगाबाद

Clerk to
Sr.Geologist
G.S.D.A. L

प्रत:-

१. जिल्हा वरिष्ठ भू वैज्ञानिक अधिकारी, लातूर.
२. उप- पोलिस अधिक्षक (मुख्यालय), लातूर.
३. सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, लातूर.
४. उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, लातूर.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय, लातूर

**स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दल, लातूर यांची दि. ०५/०८/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, लातूर येथे झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.**

महाराष्ट्र शासन निर्णय क्र. NGT- २०१८/प्र.क्र.२/ता.क्र.३ दि. १३/१२/२०१८ नुसार स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दल ची बैठक दि. ०५/०८/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता सचिव, विधी सेवा प्राधिकरण, लातूर यांच्या दालनात घेण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये खालील सन्माननिय सदस्य उपस्थीत होते.

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती. एस. डी. कंकणवाडी | - सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, लातूर. |
| २. | डॉ. श्री. बि.एन. संगनवार | - जिल्हा वरिष्ठ भू – वैज्ञानिक अधिकारी, लातूर. |
| ३. | श्री. बि.व्ही. गोमारे | - पोलिस उप – निरीक्षक (मुख्यालय), लातूर. |
| ४. | श्री. व्ही. पी. शेळके | - उप प्रादेशिक अधिकारी, लातूर. |

प्रथमत: श्री. व्ही. पी. शेळके, सदस्य, स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दल, लातूर तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, लातूर यांनी बैठकी दरम्यान सर्व सन्माननिय सदस्याचे स्वागत करून दि. १३/१२/२०१८ च्या महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानुसार पर्यावरण सनियंत्रण दलाच्या कार्यक्षेत्रा बाबतची माहिती सर्व उपस्थितांना अवगत करून देण्यात आली.

श्रीमती. एस.डी. कंकणवाडी यांनी बैठकी दरम्यान सदरील मांजरा नदीच्या प्रदुषीत पट्टयास सर्व स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दल सदस्यांनी संयुक्त भेटी देण्याबाबत सुचविले. तसेच पुढील बैठकीच्या वेळी, लातूर महानगरपालिका हद्दीमधून निर्माण होणाऱ्या घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया व विल्हेवाट या बावतच्या माहितीसह लातूर महानगरपालिकेच्या प्रतिनिधीस उपस्थीत राहण्या बाबत अवगत करावे, अशी सुचना देण्यात आली.

डॉ. बि. एन. संगनवार यांनी रेती घाट निर्मीती धोरणानुसार सदर प्रदुषीत पट्टयामध्ये कोठेही अवैध वाळू उत्खननचा प्रकार नसून शहरामधील बांधकामा करीता शेजारील गंगाखेड किंवा नांदेड येथील गोदावरी नदीच्या पात्रातील वाळू येत असल्याचे नमुद केले. तसेच पुढील बैठकीस जिल्हा खनिकर्म अधिकारी व तहसिलदार यांना उपस्थित राहण्या बाबत अवगत करावे अशी सुचना केली.

तसेच, या पर्यावरण सनियंत्रण दलाची पुढील बैठक नोव्हेंबरच्या पहिल्या आठवडयात ठेवावी, अशी सुचना श्रीमती. एस. डी. कंकणवाडी यांनी दिली.

श्री. व्ही. पी. शेळके, यांनी सर्व सन्माननिय सदस्यांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर केले.

| | | | |
|---|---|---|---|
| (व्ही. पी. शेळके) | (बि. व्ही. गोमारे) | (डॉ. बि.एन.संगनवार) | (श्रीमती. एस.डी. कंकणवाडी) |
| सदस्य | सदस्य | सदस्य | सदस्य |